REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 6 | MARCH - 2021

# शिमगोत्सवातील घुमट व जतीगीते

प्रा. डॉ. नामदेव गवळी
मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.

मालवणी मुलुखात आनंदाचा असलेला हा शिमगोत्सव म्हणजे ख-या अर्थाने लोकोत्सव व रंगोत्सव होय. जत्रा दहिकाले जवळजवळ संपलेले असतात. सराईला भाताच्या रचून ठेवलेल्या भातांची मळणी संपलेली असते. वर्षभर कष्ट करून पिकवलेले भात, भाताच्या राशीची पूजा करून घरकारभारणीच्या हातात देतो. तेव्हा त्याला वाटते आपण संसार उभा केला. शेताभातात राबलो. मात्र आता माझा काही अधिकार नाही, जे आहे ते सर्व बाईच्या हातात म्हणजे कारभारणीच्या हातात. तीने घातली तर पेज नाहीतर मी भिकारी. येथील भोळ्या भाबड्या शेतक-याच्या मनात आपण भिकारी झाल्याची जाणीव होते. तो अस्वस्थ होतो, त्याची कुजबूज चव्हाट्यावर येते. तो रंगात येतो, ढंगात येतो, नाचतो, गातो, सोंगे काढतो. खेळीया गडी होतो. आता आपण काहीतरी सोंगे काढून पोट भरावे असे त्याला वाटू लागते. तेव्हा आपली ग्रामदेवता, आपले पूर्वज कसे जगले हे त्याला आठवू लागतात. मग माझ्यासारखो मियाच? माझा कोण वाकडा करतालां? असा वागू लागतो. यावेळी ढोल, झांज, डफ, घुमट, पायातील चाळ, टिप-या बाहेर निघतात. हा कष्टकरी रंगात येतो, ढंगात येतो आणि काव्याचा निर्माता होतो. शबय गोळा करतो. ढोल पोटावर घेऊन नाचतो.

## घुमट व जतीगीतेः-

होळीच्या दिवसात मानक-याच्या मांडावर घुमट गीते गायली जातात. घुमट म्हणजे गोलाकार मडके ज्याला दोन्ही बाजुने तोंड असते एका बाजुला कातडे व एक बाजू रिकामी असते. कलाकार घुमट वाजवताना दोन्ही हाताचा वापर करतो. घुमट नसेल त्या ठिकाणी झांज, टिप-या घेवून विशेषतः पुराणगीते गायली जातात. काही ठिकाणी जती म्हणजे पुराणगीते सामाजिक गीते गातात.

### गणेश नमन गीत

प्रथम नमोदेव गणेश नमला,
कारे मजला आनंद झाला
आपल्याच रणी गण नाचू लागला,
नाचबा गणया लागान शेंदुर
वंदा हो गणरायाऽऽ
गणगौरीचा हात माझा हात माझा
परणीता तळ तुझा रे बा एकदंत
एकदंत तुझा सोन्याने मढविला
दोनी जो मेळविल का नागबंध
नागबंद देवा चंदनाची उटी
कस्तुरी लल्लाटी रे बा एक आली
ये ते तुझ्या नयनाऽऽऽऽऽ

सावरीयाऽऽऽऽऽ भोवरीयाऽऽऽऽऽ
रंगणा टवळीच्या टावळीया काय त्याचे बोधरूप
बोधना बोलना तु माझा अनंत
अकांत सुरंगीचा रे बा धन्य तुझे
सुस्मरण ध्यान करू आता
सद्गुरूनाथ  गणनाथा
चरणावरी माथा रे बा ठेवोनीया.
जय दत्ता घडी जय दत्ता.
सुस्मरण करू आता सद्गुरूनाथ गणनाथा चरणावरी ठेवी माथा.
जय दत्ता घडी जय दत्ता होऽऽऽऽऽहा

जतीगीतात हे नमनाचे गीत असून हे गणपती वंदन आहे. या वंदनानंतर दुसरे जतीगीत म्हटले जाते. या गीतात गणेशाचे सर्व प्रकारचे भावनिक वर्णन येते.

### रामायण गीत

यदुवरा देवा मोरेश्वरा पहिले नमन हो
बाळ जलमले परदेशी दशरथाचे वंवशी बाळ जलामले
परदेशी कौशल्याचे कुशीयो बाळ जलामले
पाळणा सजिवला घडी घडी वर झेंडा मोत्याचा पाळणा सजीवला
घडी घडी रथ चाले रामचा पाळणा सजीवला
रथाला बावन खिडक्या त्याला चार चाका हो
संगे घेऊनिया दरबार अष्टकोटी वानर संगे घेऊनीया
जाऊन उतारले लंकेत राजा रघुनाथ जाऊन उतारले
लंका वेढली रामाने अनेक हनुमंताने लंका वेढली
रावण बोलतसे फुशारकी मारीन या रामाची रावण बोलतसे
मंदोदरी पुसतसे रामाला चुडेदान दे ममा मंदोदरी बोलतसे
जय दत्ता घडी जय दत्ता हो ऽऽऽऽऽऽऽऽऽऽया

सदर नमनाचे गीत घुमट किंवा टिपरी ठेक्यावर गाताना लय, नाद, ठेका, हावभाव आणि परंपरा यांची समुह उर्जा एकजिव होते. या गीतात रामायण, महाभारत तसेच आधुनिक विषय असतात. आता महाभारत गीत पाहू-

### पांडव गीत

पांडवाच्या घरी रे दस अवदसा दस अवदसा
चिचेच्या झाडाखाली आराम केला आराम केला
वनवासी जाता वाटे दिस मावळला दिस मावळला
पाचानी पाच पार वाटून घेतले वाटून घेतले
पयल्या पाराला कोण देव जागे कोण देव जागे
पयल्या पाराला सहदेव जागे सहदेव जागे
सहदेवाच्या पार हो तिन सांजच्या भरा हो तिन सांजच्या भरा
त्याने पार घेतलाजी बाय हो त्यानी पार घेतलाजी
दुस-या पाराला कोण देव जागे कोण देव जागे

दुस-या पाराला नकुल जागे हो नकुल जागे
त्याने पार घेतलाजी काय हो त्याने पार घेतलाजी
तिस-या पाराला कोण देव जागे कोण देव जागे
तिस-या पाराला अर्जुन जागे अर्जुन जागे
त्याने पार घेतलाजी काय हो त्याने पार घेतलाजी
चौथ्या पाराला कोण देव जागे कोण देव जागे
चौथ्या पाराला भीमसेन जागे भीमसेन जागे
भीमाच्या पारी हो हीवथोर वारा हीवथोर वारा
भीमाचा पारा हो फाटफटीच्या वेळा हो फाटेच्या वेळा
ताडमाड मोडून भीमाने परशा पाजळीला हो परशा पाजाळीला
परशाच्या उजेड हो बारा गाव पडे बारा गाव पडे
परशाच्या उजेडान दैत्य धावला दैत्य धावला
ताडमाड मोडून भीमाने दैत्य वधला दैत्य वधला
दैत्य वधला म्हणून बहिण धावली बहीण धावली
नको मारू भीमा तुझी होईन अस्तुरी होईन अस्तुरी
आडावली गदा भीमाने होवरी केली होवरी केली
तळावाची सावली वरदारी आली वरदारी आली

एखाद्या कुटूंबामध्ये येणारी संकटे, समस्या त्यांना सामोरे जाण्याचे धाडस, धैर्य कुटूंबियांमध्ये येण्यासाठी घरातील कर्ता पुरूष अशा प्रकारची गीते गावून कुटूंबाला सावरण्याचा प्रयत्न करतो. रामाला वनवास भोगावा लागला, पांडवांना वनवास भोगावा लागला मग आपणासारख्या सर्वसामान्यांचे काय? असा प्रश्न उत्पन्न करून मनोधैर्य वाढवितो. भाषेच्या जोरावर तन मन धन जिंकता येते याचा प्रत्यय अशा गीतातून येत असतो.

या लोकगीतात वरवर आंतरजातीय विवाह कथा पण ही एक तडजोड आहे. भीम लग्न करतो

पण त्यामुळे सामन्य वर्गातील स्त्री उच्च कुळात येते. पांडव वनवासात असताना प्रत्येकजण आपापली जबाबदारी कशी सांभाळत होते. याबरोबर प्रत्येकजण आपापली कामे करताना जबाबदारीचे भान ठेवतात याची ही कथा आहे.

जनक राजाच्या घरी उपवर मुलगी सीता असते. सीतेच्या सांगण्याप्रमाणे जनक राजा स्वयंवर मांडतो. या लग्नासाठी कोणाकोणाला आमंत्रण देतो हे पुढील लोकगीतात (जतीगीतात) आढळते. हे आमंत्रण गणपती, चंद्र, सुर्या पासून पाच पांडवांना सुध्दा आहे. इतकेच नव्हे तर देशोदेशीच्या राजांना आमंत्रण दिलेले आहे. वस्तविक रामायण व महाभारताचा काळ वेगवेगळा आहे. या जतीगीतात मात्र देवादिकांपासून पंचमहाभूतांपर्यंत सर्वांना आमंत्रण आहे.

### रामायण गीत

जनकाच्या घरी येक सीता नवरी सीता नवरी
त्यांना स्वयंवर मांडिला काय गा त्याने स्वयंवर मांडिला
पयला पत्र धाडला गणपती देवा
गणपती देव बा चालोनी आले
नाय भरले सीतेचे निमाचे घडे
दुसरा पत्र धाडला चांद सुरयाला
चांद बा सुरया चालोनी आले चालोनी आले
नाय भरले सीतेचे निमाचे घडे निमाचे घडे
तीसरा पत्र धाडला पाचपांडवा पाचपांडवा
पाच बा पांडव चालोनी आले चालोनी आले

नाय भरले सीतेचे निमाचे घडे निमाचे घडे

या गीतात जनक राजा सर्वांना सीतेचे स्वयंवराचे निमंत्रण देतो. देशोदेशीचे राजे स्वयंवरासाठी येतात. पण सगळे हरतात.

जनक राजाने धनुष्य आणून ठेवले शोभेस
जो कोण उचलील धनुष्याला सीता द्यावी तयाला
आला रावण अहंकारी धनुष्य आले उरावरी
उचलीला धनुष्य रामाने डाव्या पायाच्या अंगठ्याने
धनुष्य टाकले मोडून धनुष्य टाकले मोडून
सीतेची माळ रामा गळयावरी माळ गळयावरी
जय दत्ता गुरू जय दत्ता
(जतीगीत-आख्यानावर आधारित गीतप्रकार, निम-अविवाहितपणा)

हे धनुष्य उचलायला रावण येतो पण फसतो, मात्र राम हे धनुष्य उचलतो व सीता जिंकतो. या गीतात पाचपांडव म्हणजे पंचमहाभुते यांना जनक राजा आमंत्रण देतो असे डॉ.विनायक खेडेकर यांनी २९ सप्टेंबर १९९६ ला लोकसाहित्य अभ्यास शिबीर एस. पी. के. महाविद्यालय सावंतवाडी येथे आपल्या व्याख्यानात म्हटले आहे. वास्तविक रामायण व महाभारत यांचे कालखंड वेगळे असले तरी मालवणी जतीगीतात हे वेगळेपण एकत्रित जपताना व उजळणी करताना मनाला एक वेगळाच आनंद देते.

मालवणी मुलुखाचे उदाहरण म्हणजे कोकण वगळता उर्वरीत भागात सर्वजन देवाच्या भेटीसाठी देवळात, चर्च, मशिद यामध्ये जातात. पण या मुलुखात प्रत्यक्ष देव पालखीत बसून प्रत्येकाच्या घरी येतो. हा रोमांचकारी सोहळा येथील लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे.

### रामायण गीत

राम लक्ष्मण सीता तिघाजणा
गुंफा बांधली अंटग्यावना
कपट्या रावणान कपटपान केला
मायेचा मृग दाराशी सोडला
रामगा भ्रतारा लक्ष्मण दिरा
हा मृग मारा नि काचोळी शीवा
मायेचा मृग पळू लागला
जाय त्या बंधूच्या शोधा जा दिरा
मी जायन सीते पण तू एकली
साळीचे तांदूल घोळतसे सुपा
भाळलास काय माझ्या रुपाला दिरा
तेवा तो लक्ष्मण मना खट्टी जाला
घेतला धनुष्य नि चालीला वना
कपट्या रानवनात कपटपान केला
झोळीपात्र घेवोनी गुंफेदारी आला
भिक्षा वाढ माई म्हणून शब्द बोलीला
आम्ही खातो कंदमुला तुम्हा काय वाढू
राम गा खायी जे आम्हा पाहिजे
कंदामुळा सीतेने भरली ओंजळा

भिक्षा घे रे बा म्हणून शब्द बोलली
एक पाय भुतूर नी एक पाय बाहेर
दुभावाची भिक्षा नको गे नारी
सत्व घेऊन लंके जाईन माघारी
सत्वाकारणान सीता बाहेर पडली
कपट्या रावणान खांदी मारली
राम गा लक्ष्मण गुंफेसी आले
राम गा लक्ष्मण सोदू लागले
सीते शोधू विर कोण धाडू म्हणती
अंजनीचा पुत्र हनुमंत बळी
तो एक विर जाई लंके माघारी
लंकेशी जाता वाटे मिळाले सात ऋषी
तेव्हा ते ऋषी काय बोलना झाले
दोन धोंड्याचे रांजन केले हनुमंता
एक लावले ढोपर रे हनुमंता
चाळणीन पाणी आणला रे हनुमंता
चाळणीन  पाणी आणला रे हनुमंता
तेव्हा ते ऋषी बोलते झाले
इच्छेने आमचे पोट भरले हनुमंता
सांगावी लंकेची वाट हो मुनी
आडव्या उभ्या गोलांट्या मारी हनुमंता
लंकेशी जाऊन फडशी मारी हनुमंता
जय दत्ता गुरू जय दत्ता

या गीतात वनवासात राम, सीता व लक्ष्मण असताना रावण मायेच्या रूपात येतो.  तो मायावी हरणाचे रूप घेतो.  सीतेला मृगाच्या कातडीची चोळी घालाविशी वातते.  रामाला ती हरणाची मृगया करायला सांगते.  राम शिकारीला जातो; पण लक्ष्मण सीतेच्या रक्षणासाठी थांबतो.  रावण मेल्याचे सोंग घेवून लक्ष्मणा धाव अशी हाक मारतो.  पण सीतेचे रक्षण करण्याची जबाबदारी असल्याने तो गप्प राहतो. साळीचे तांदूळ सुपात घोळत असलेली सीता दिराला म्हणते माझ्या रुपाला भुलून तू जात नाहीस.  माझ्या रूपाची तुला भूल पडली.  तेव्हा लक्ष्मण रामाच्या रक्षणासाठी रानात जातो.  ही वेळ साधून रावण सीतेचे अपहरण करतो.

जतीगीतात जनकाच्या घरी सीता नवरी, श्रावण बाळाची कथा, पंढरपुरची कथा असे अनेक विषय येतात.

**संकलनः-** प्रा. डॉ. नामदेव गवळी (सहयोगी प्राध्यापक), आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ता. वैभववाडी.